स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**महसुल विभाग**

# तहसिलदार, सावली (प्रशासकीय भवन) यांचे कार्यालय 441225

दुरध्वनी क्रमांक : 07174 - 274541

ई-मेल : tah.saoli@gmail.com

पत्र क्र. कावि/तलाठी आस्था/2023/ 158

दिनांक : 22.05.2023

## -: जाहीरनामा :-

संदर्भ :- मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे पत्र क्र. मशा/कार्या-2/आस्था टे-4/2023/681, दि. 10.05.2023.

*****

सर्व नागरिकांना याव्दारे सुचित करण्यांत येते की, सावली तालुक्यातील खालील तलाठी साजांकरिता, त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या प्रवर्गातून कोतवाल पद भरावयाचे आहे.

| अ.क्र. | कोतवाल पद भरावयाच्या साजाचे क्रमांक व नांव | कोतवाल पद भरावयाची संख्या | आरक्षणाचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| 1 | 13 - जिबगाव | 1 | भटक्या जमाती क |
| 2 | 5 - मेहा बुज | 1 | भटक्या जमाती ड |
| 3 | 1 - पालेबारसा | 1 | इतर मागास वर्ग |
| 4 | 3 - विहीरगाव | 1 | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) |
| 5 | 2 - गेवरा बुज | 1 | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) |

उपरोक्त प्रवर्गातील कोतवाल पदाकरिता इच्छुक सबंधित साजातील कायम वास्तव्य असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत. तरी उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज, अर्जासोबत विहीत प्रपत्रे, दोन पासपोर्ट साईज फोटो, आवश्यक कागदपत्र व पुराव्यासहीत दिनांक 24 मे 2023 ते 07 जून 2023 या कालावधीत कार्यालीन वेळेत तहसिलदार, सावली यांच्या कार्यालयात आस्थापना शाखेत सादर करावेत व त्याबाबत पोच घ्यावी . अर्जाचा नमुना तहसिल कार्यालयातील आस्थापना शाखेत कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे. विहीत तारखेनंतर येणाऱ्या व अपुर्ण भरलेल्या अर्जाचा तसेच जाहीरनाम्याच्या पूर्वी सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**कोतवाल भरती संबंधी वेळापत्रक**

1) अर्ज स्विकारण्याची तारीख 24 मे 2023 ते 07 जून 2023 रोजी सायंकाळी 06.15 वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळुन)

2) अर्जाची छाननी दिनांक 08 जून 2023 रोजी सकाळी 11.00 वाजे पासून तहसिल कार्यालय, सावली येथे करण्यांत येईल. पात्र उमेदवारांच्या यादीची प्रसिध्दी त्याच दिवशी तहसिल कार्यालय सावली यांचे सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल.

3) पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा गुरुवार दिनांक 15 जून 2023 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत **राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय सावली** येथे घेण्यांत येईल. सर्व पात्र उमेदवारांनी आपले अर्जाची पोच पावतीसह परीक्षेस उपस्थित राहाणे बंधनकारक आहे.

4) परिक्षेचा निकाल दिनांक 27 जून 2023 रोजी पर्यंत जाहीर करण्यात येईल.

5) उमेदवारांची परीक्षाकेंद्रात किमान 1 तास अगोदर उपस्थित रहावे.

तहसिल कार्यालय सावली

**कोतवाल भरतीसाठी पात्रता व अटी पुढीलप्रमाणे**

1) उमेदवार हा किमान इयत्ता 4 थी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे (पुरावा जोडण्यात यावा) (मराठी लेखन व वाचनाचे ज्ञान आवश्यक)

2) उमेदवाराचे वय अर्ज दाखल करावयाच्या अंतिम दिनांकास कमीत कमी १८ वर्ष व जास्तीत जास्त ४० वर्ष यादरम्यान असावे. (पुराव्या दाखल जन्मतारखेचा दाखला/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/पॅनकार्ड/ड्रायव्हींग लायसन्स / इयत्ता 10 वी चे प्रमाणपत्र यापैकी एखादा पुरावा जोडणे आवश्यक आहे.) याव्यती रिक्त इतर कुठलाही पुरावा ग्राहय धरला जाणार नाही.

3) सक्षम अधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यकआहे.जातीचे प्रमाणपत्र न जोडल्यास अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल. तसेच उमेदवाराची नियुक्ती झाल्यास नियुक्ती दिनांका पासुन 6 (सहा) महिन्याचे आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. विहीत कालावधीत वैधताप्रमाणपत्र सादर न केल्यास नियुक्ती रद्द करण्यांत येईल.

4) उमेदवार हा ज्या साजातील कोतवाल पदासाठी अर्ज करणार आहे त्या संबंधित तलाठी साजाचा रहिवाशी असावा. उमेदवाराने स्थानिक जागेचा रहिवाशी असल्याबाबतचे (घरटॅक्सपावती/रेशनकार्ड/ निवडणूकओळखपत्र/ मनरेगा अंतर्गत जॉबकार्ड / पॅनकार्ड / आधारकार्ड) यापैकी एखादा पुरावा जोडणे व तलाठी यांचा रहीवास दाखला आवश्यक आहे. याव्यतीरिक्त इतर कुठलाही पुरावा ग्राहय धरला जाणार नाही.

5) उमेदवार शारिरिक दृष्टया सक्षम असावा, नियुक्ती नंतर जिल्हा मेडिकल बोर्डा चे प्रमाणपत्र 1 (एक) महिन्यात उमेदवाराला सादर करावे लागेल. त्याची जबाबदारी उमेदवाराचीअसेल. सदर प्रमाणपत्र 1 (एक) महिन्यात सादर न केल्यास सदरची निवड रद्द करण्यांत येईल.

6) उमेदवाराने चारित्र्याबाबत संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक यांचे प्रमाणपत्र नियुक्ती नंतर सादर करावे. सदर प्रमाणपत्र 1 (एक) महिन्यात सादर न केल्यास सदरची निवड रद्द करण्यांत येईल.

7) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन परिपत्रक दिनांक 1/7/2005 नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञा पत्र) नियम 2005 नुसार सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात प्रतिज्ञापत्र नियुक्ती नंतर देणे आवश्यक राहील.

8) लेखी परीक्षेकरिता उपस्थित राहत असतांना ओळखीचा पुरावा म्हणून, आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, पॅन कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना इत्यादी सोबत असणे आवश्यक आहे. त्याशिवाय परिक्षा कक्षात प्रवेश दिल्या जाणार नाही.

9) सदर परिक्षेला आपणास कुठलेही पुस्तकी साहित्य, कॅल्क्युलेटर, मोबाईल इत्यादी घेऊन बसता येणार नाही.

10) सदर परीक्षा ही वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (OBJECTIVE) स्वरुपाची असून 100 गणांची असेल.

11) अर्जा सोबत कुठल्याही राजकीय पक्षाची शिफारस जोडलेली नसावी. अन्यथा आपला अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल .तसेच निवड प्रक्रियेदरम्यान कुठलाही दबाव आणल्यास आपली निवड रद्द करण्यांत येईल.

12) अर्ज हा अर्जदारानेच वैयक्तिक स्वत:हजर राहून सादर करावा.अर्ज पोस्टाव्दारे पाठविण्यांत येवू नये.

13) अपुर्ण माहितीचे अर्ज रद्द करण्यांत येईल.त्याबाबत कोणतेही पत्र व्यवहार करण्यांत येणार नाही.

14) अर्जामधिल माहिती खोटी आढळल्यासअर्ज रद्द करण्यांत येईल किंवा नियुक्ती झाल्यानंतर ती रद्द करण्यांत येईल.

15) अर्जदाराला निवड प्रक्रियेसाठी स्व खर्चाने यावे लागेल.

16) वेळोवेळी निर्गमीत झालेल्या शासन निर्णयानुसार कोतवाल मानधन देण्यात येईल.

17) उमेदवाराची निवड ही तलाठी साजाकरिता असुन, त्या अंतर्गत समावेश असणाऱ्या गावापैकी एका गावात त्याला वास्तव्य करावे लागेल.

18) सदर भरतीप्रक्रीयेच्या अनुषंगाने वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल, तसेच सदरील प्रक्रीयेत काहि बाबी नमूद करावयाच्या राहील्यास किंवा अनावधानाने चुकीच्या नमूद केल्यास त्या प्रचलीत शासन निर्देशानुसार व निर्णयाप्रमाणे लागु राहतील.

19) ज्या साजाकरीता कोतवालाची निवड करावयाची आहे, त्या साजाबाहेरील रहीवासी असलेल्या उमेदवारांचा अर्ज हया निवडप्रकीयेसाठी विचार केल्या जाणार नाही.

तहसिल कार्यालय

20) जाहीरनाम्यामध्ये दर्शविलेल्या पदाबाबत काहि अपरीहार्य कारणाने परिक्षा स्थगीत झाल्यास त्याबाबत उमेदवारांना कोणताही दावा सांगता येणार नाही. पदांचे आरक्षण परिक्षा स्थगित करणे रदद करणे, अशत: बदल करणे, भरती प्रक्रीयेत बदल करणे, भरती प्रक्रीयेसंदर्भात अन्य कोणतीही तांत्रीक / प्रशासकीय अडचण तक्रारीबाबतचे सर्व अधिकार कोतवाल निवड समितीकडे आहेत.

20) **परीक्षा शुल्क — उमेदवारांनी खालीलप्रमाणे परीक्षा प्रक्रीया शुल्क भरणे आवश्यक आहे.**
**(1) खुला प्रवर्ग -500 रुपये, व (2) मागास प्रवर्ग 300 रुपये याप्रमाणे राहील.**

22) **विहीत नमुन्यातील अर्ज तहसिल कार्यालय सावली येथे रुपये 50/- शुल्क भरुन उपलब्ध करुन देण्यात येईल.**

23) फक्त विहित नमुन्यातील अर्ज स्विकारण्यात येतील.

24) वरिल सर्व अटी व शर्तीना अनुसरुन तहसिलदार, सावली नियुक्ती अधिकारी व जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचा निर्णय अंतिम राहिल.

तहसिलदार, सावली

प्रतिलीपी :-

1) मा.जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.

2) मा.उपविभागीयअधिकारी, मुल यांना माहितीस सविनय सादर.

3) जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, जि. का. चंद्रपूर यांनी NIC वर सदर जाहीरनाम्याची प्रत प्रसिध्द करावी.

4) गट विकास अधिकारी, पंचायत समिती सावली यांनी आपल्या कार्यालयाचे सुचना फलकावर जाहीरनामा प्रसिध्द करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

5) तलाठी साजा.जिबगाव, मेहा बुज, पालेबारसा, विहीरगाव व गेवराबुज यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयातील सुचना फलकावर लावून व **साज्यातील सर्व गावांत** तशी प्रसिध्दी / मुनादी देवून त्याबाबतचा अहवाल याकार्यालयास सादर करण्यात यावा.

6) सचिव ग्रामंपचायत --------------------------- यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयातील सुचना फलकावर लावून प्रसिध्दी अहवाल याकार्यालयास सादर करण्यात यावा.

7) जमादारमाल तहसिल कार्यालय, सावली यांना आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयातील सुचना फलकावर लावून प्रसिध्दी अहवाल याकार्यालयास सादर करण्यात यावा.

तहसिलदार, सावली

तहसिल कार्यालय सावली